

व्हॅलेंटाईन डे : प्रेमाचा दिवस की माणुसकीची आठवण? पान 2

दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा... आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा — Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १८३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१४ फेब्रुवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# शेतकऱ्यांच्या घामाचं 'पांढरं सोनं' जिनिंगमध्ये भस्मसात!

## भीषण आगीत १२ कोटींची राख, तब्बल १८ हजार क्विंटल कापूस जळून खाक



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कुही तालुक्यातील कुही आंभोरा मार्गावरील भंडारबोडी परिसरातील कल्पना जिनिंग कारखान्यात गुरुवारी सायंकाळी लागलेल्या भीषण आगीने केवळ आर्थिकच नव्हे तर औद्योगिक सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. सुमारे १८ हजार क्विंटल कापूस जळून खाक झाला असून अंदाजे १२ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेत आठ वर्षीय रोहन सुरेश दूधवे हा बालक भाजला असून त्याच्यावर नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे सांगितले आहे.

नियंत्रण कक्षाला आग लागल्याची माहिती मिळताच कुही येथून दोन अग्निशमन गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. मात्र कारखान्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर साठवलेला कापूस आणि इतर ज्वलनशील साहित्यामुळे आगीने काही क्षणांतच विक्राळ रूप धारण केले. त्यानंतर मौदा व उमरेड येथील अग्निशमन पथकेही मदतीसाठी दाखल झाली. रात्री उशिरापर्यंत धुराचे लोट आणि ज्वाळा दूरवरून दिसत होत्या.

मिळालेल्या माहितीनुसार, आगीच्या वेळी कारखान्यात नियमित काम सुरू होते. अचानक धूर आणि ज्वाळा दिसताच कामगारांनी बाहेर पडण्याची धावपळ केली. परिसरातील काही नागरिकही त्या वेळी जवळ असल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या गोंधळात एका लहान मुलाला भाजल्याची घटना घडली. घटनेनंतर गावकरी मोठ्या संख्येने घटनास्थळी जमले होते. सुरक्षेच्या कारणास्तव काही काळ वाहतूकही थांबवण्यात आली.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी प्राथमिक तपासात शॉर्ट सर्किटमुळे ठिणगी पडून आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात कापूस साठवला असताना अग्निसुरक्षा उपाययोजना पुरेशा होत्या का, अग्निशामक यंत्रणा कार्यरत होती का, तसेच विद्युत यंत्रणेची नियमित तपासणी झाली होती का, याबाबत प्रशासन चौकशी करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. तहसीलदार, नायब तहसीलदार आणि पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. नुकसानाचा पंचनामा सुरू असून कारखान्याच्या सुरक्षा मानकांची तपासणी केली जात आहे.

दरम्यान, या दुर्घटनेमुळे स्थानिक शेतकरी आणि कापूस व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण आहे. मोठ्या प्रमाणात कापूस जळाल्याने पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने तातडीने मदत व नुकसानभरपाई प्रक्रियेबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# नवी मुंबईतील हॉस्पिटल अडकले राजकीय वादाच्या विळख्यात

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, नवी मुंबई :** आमदार मंदा म्हात्रे यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला सुपर स्पेशालिटी रुग्णालय प्रकल्प अडचणीत आला आहे. नवी मुंबई महापालिकेत गणेश नाईक यांनी भाजपची एकहाती सत्ता आणली आहे. नवी मुंबई पालिकेत महापौर, उपमहापौर भाजपचा म्हणजेच नाईक समर्थक बसलेले आहेत. तर शिंदे गट प्रमुख विरोधी पक्ष असणार आहे, अशात महापालिकेत पुन्हा भाजप विरुद्ध शिवसेना अशी लढाई पाहायला मिळण्याची शक्यता असतानाच, आता सत्ताधारी भाजपने थेट स्वपक्षीय आमदारांनाच दणका दिला आहे. महापौरांच्या मान्यतेने थेट सीबीडी बेलापूर येथे होणाऱ्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या जागेत फेरबदल अथवा प्रस्ताव रद्द करण्याबाबतचा ठराव आगामी महासभेत मांडण्यात येणार आहे.

मुख्य म्हणजे यावेळी भाजप नेत्यांनी चतुराई दाखवत आपल्या कोणत्याही नगरसेवकांच्या नावे हा ठराव न मांडता, १४ गावांमधील अपक्ष म्हणून निवडून आलेले नगरसेवक भरत भोईर यांच्या खांद्यावर बंदूक ठेवत ठरावाची सूचना मांडली आहे. स्वपक्षातूनच शह देण्याचा प्रयत्न केला गेल्याने आ. मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी सायंकाळी उशिरा भेट घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज हे ८.४० एकरामध्ये उभारले जाणार असून अंदाजे ८१९.३० ते ८५० कोटी खर्च येणार आहे. तसेच या हॉस्पिटलमधील रुग्णाची क्षमता ही ५०० बेड हून अधिक राहणार आहे. तसेच सदर उभारल्या जाणाऱ्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजवर पूर्ण नियंत्रण हे नवी मुंबई महानगरपालिकाचे असणार



आहे. तसेच लवकरच सिडको प्राधिकरण यांच्या बरोबर करार होणार असून निविदा प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. राज्य सरकार, सिडको आणि म हापालिकेकडून लागणाऱ्या सर्व मान्यता आणि मंजुरी, परवानग्या मिळाल्या आहेत.

दरम्यान या रुग्णालयासाठी सिडकोने भुखंड दिल्यावर, या भूखंडाचा मैदान म्हणून वापर करणाऱ्या क्रिकेट संघटना तसेच इतरही पर्यावरण संघटना कोर्टात गेल्या आहेत. आमचा रुग्णालयाला विरोध नसून, रुग्णालय व्हावे मात्र ते इतरत्र व्हावे अशी मागणी ४० प्लस या क्रिकेट संघटनेने केली आहे. याबाबत त्यांनी गणेश नाईकांकडे देखील मागणी केली होती. मात्र आता सिडकोने हा भूखंड पालिकेला हस्तांतरित केल्यावर, पालिकेने देखील त्याचे पैसे सिडकोला अदा केले आहेत, मात्र आता आ. मंदा म्हात्रे यांनी सत्याने गणेश नाईक यांच्याविरोधात आवाज उठवला असताना, अखेर पालिकेतील सत्तेच्या जोरावर आ. मंदा म्हात्रे यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला सुपर स्पेशालिटी रुग्णालय प्रकल्प रोखण्याचा प्रस्ताव पहिल्याच महासमेत सताधारी भाजपाने आणला आहे. त्यामुळे आगामी काळात आ. मंदा म्हात्रे व गणेश नाईक यांच्यातील वितुष्ट कोणते टोक गाठते ते पाहावे लागणार आहे.

पीजी, नर्सिंग शैक्षणिक वस्तीगृह, पदव्युत्तर शैक्षणिक संकुल, अभियांत्रिकी यार्ड, रूग्णासोबत येणाऱ्या नातेवाईकांना राहण्यासाठी धर्मशाळा, नर्सिंग वस्तीगृह, अभ्यागत केंद्र, पदव्युत्तर वस्तीगृह, व इतर अनेक सुख-सुविधा उपलब्ध होणार आहेत. ही वास्तू तळमजल्यासह ७वाहनतळ यात असणार आहे. पालिकेचे स्वतःचे मल्टीस्पेशालटी रुग्णालय असावे, अशी मागणी वाढत होती. कोविड काळात स्वस्तात उपचार करणा-यारुग्णालयाची गरज प्रकर्षाने जाणवली होती. गेली अनेक वर्ष आ. म्हात्रे या रुग्णालयासाठी पाठपुरावा करत होत्या. शासनाने अल्प किमतीत पालिकेला भुखंड देत जीएसटी रक्कम देखील माफ केली होती. हे रुग्णालय झाल्यास नागरीकांना अत्याधुनिक उपचाराकरिता खासगी रुग्णालयांमध्ये जावे लागणार नाही नसून, स्वस्तात उच्च दर्जाचे उपचार मिळणार आहेत. याच इमारतीत कॉलेज देखील सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा मिळणार आहे.

रुग्णालय या प्रयोजनासाठी सिडकोने २१६२३.१६ चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड पालिकेला दिला आहे. हा भुखंड घेताना, शहरात पालिकेची अनेक रुग्णालये असताना तर पोसला जाणार नाही ना? खर्च पालिकेला परवडेल का? आर्थिक भाराचे काय ? असे अनेक प्रश्न विचारून आ. मंदा म्हात्रे यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला होता. मात्र त्यावर मात करत पालिकेला रुग्णालय चालवणे जड जाऊ नये म्हणून आ. म्हात्रे यांनी ४० टक्के वाणिज्यिक वापराची मागणी मुख्यमंत्र्यांकडे उपमुख्यमंत्र्यांकडे केली होती. पालिकेने देखील तातडीने सिडकोकडे मागणी केल्यावर, सिडकोने तातडीने नगरविकास विभागाला प्रस्ताव पाठवला होता.

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी

# आरोपीस जन्मठेपेची शिक्षा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, नेवासा :** अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी ज्ञानेश्वर भास्कर तारडे यास विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. ही घटना नेवासा तालुक्यात दि. ७ सप्टेंबर २०२२ रोजी घडली होती.

घटनेनुसार, सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास पीडिता व तिची आई घरी असताना आरोपी त्यांच्या घरी आला. पीडितेच्या आईने आरोपीस मुलीला कॉलेजमध्ये सोडण्यास सांगितले. त्यानंतर आरोपीने पीडितेला मोटरसायकलवरून कॉलेजकडे नेण्याऐवजी अहिल्यानगर-संभाजीनगर रोडवरील एका लॉजमध्ये नेले. तेथे आरोपीने पीडितेच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केला तसेच घटनेबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

सायंकाळी पीडितेची आई मुलीला कॉलेजमधून आणण्यासाठी गेली असता आरोपी व पीडिता एकत्र दिसल्याने संशय निर्माण झाला. त्यानंतर नेवासा पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा रजिस्टर क्र. ८०१/२०२२ अन्वये अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास उपनिरीक्षक मनोज मोंढे, स.पो.नि. ज्ञानेश्वर थोरात तसेच डीवायएसपी संदीप मिटके यांनी केला. भारतीय दंड संहिता कलम ३६३, ३६६(अ), ३७६, ३७६(२), ५०६, १०९, ११४ तसेच पोक्सो कायद्याअंतर्गत विविध कलमांनुसार आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत सबळ पुराव्यांसह न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान पीडिता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी डॉ. बागवान, स्त्रीरोग तज्ञ डॉ. कटारिया, न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेचे अधिकारी तसेच तपास अधिकाऱ्यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. वैद्यकीय तपासणी अहवाल, एफएसएल अहवाल व हस्ताक्षर तज्ज्ञांचा अहवाल हेही निर्णायक पुरावे ठरले. सरकारी पक्षातर्फे ॲड. एम. एस. काळे यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व पुरावे लक्षात घेता विशेष न्यायाधीश आर. आर. हस्तेकर यांनी आरोपी ज्ञानेश्वर भास्कर तारडे यास पोक्सो कायदा कलम ४ अन्वये जन्मठेप व आजन्म सश्रम कारावास, भादंवि कलम ३६३ अन्वये सात वर्षे सश्रम कारावास, भादंवि कलम ५०६ अन्वये एक वर्ष सश्रम कारावास तसेच सहा हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना साधी कैद अशी शिक्षा सुनावली.

# विंचूर ग्रामस्थांच्या आंदोलनाला यश; शाळेची जागा सुरक्षित

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या (गट नं. ६२७) जमिनीवरून सुरू असलेल्या वादात अखेर प्रशासनाने हस्तक्षेप केला आहे. ग्रामस्थांनी केलेल्या 'रास्ता रोखो' आंदोलनाची दखल घेत, शाळेची नोंद कायम ठेवण्याचे आणि महसूल नोंदींची सखोल पडताळणी करण्याचे आदेश निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिले आहेत.

**नेमके प्रकरण काय?**

विंचूर ग्रामपंचायतीचे सरपंच सचिन रत्नाकर दरेकर यांनी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रशासनाला निवेदन दिले होते. एका चुकीच्या जनरल मुखत्यारपत्राच्या आधारे शाळेची जम ीन खरेदी करण्यात आल्याचा खळबळजनक आरोप त्यांनी केला होता. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी निगडित हा विषय असल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत होता.

**प्रशासकीय तपासातील महत्त्वाचे मुद्दे :**

तहसीलदारांनी भूमी अभिलेख विभागाकडून मागवलेल्या अहवालात काही तांत्रिक त्रुटी समोर आल्या आहेत:

**क्षेत्रफळ :** मूळ सर्वे नं. ६८२ (सध्याचा गट नं. ६२७)



चे एकूण क्षेत्र ०.५४ आर आहे.

**मालमत्ता पत्रक :** १९७३ पासून सिटी सर्वे नं. १२३२, १२३३ आणि १२३४ या जमिनी जिल्हा परिषद, नाशिकच्या नावे आहेत.

**प्रक्रियेतील त्रुटी :** खुल्या जागेचे स्वतंत्र मालमत्ता पत्रक तयार न झाल्याने ७/१२ उतारा तांत्रिकदृष्ट्या बंद झाला नव्हता. याच संधीचा फायदा घेत ०.१०.५० आर क्षेत्राची बेकायदेशीर खरेदी झाल्याचे प्राथमिक तपासात दिसले आहे.

**पुढील कार्यवाही :**

**१.** खुल्या जागेचा स्वतंत्र सीटीएस क्रमांक निश्चित करून ७/१२ उतारा कायमस्वरूपी बंद केला जाणार.

**२.** जिल्हा परिषद शाळेच्या नावावरील नोंदी सुरक्षित केल्या जाणार.

**३.** खरेदी-विक्री व्यवहारातील कायदेशीर दोष तपासले जाणार.

प्रशासनाच्या या भूमिकेमुळे विंचूरमधील शैक्षणिक क्षेत्रातील अतिक्रमण रोखले जाणार असून, ग्रामस्थांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

**तहसीलदारांचा कठोर इशारा !**

शिक्षण संस्थेच्या जमिनीबाबत प्रशासन कोणतीही तडजोड करणार नाही. या प्रकरणात कोणताही फेरफार किंवा हस्तांतरण करू नये, असे आदेश तलाठ्यांना दिले आहेत. तसेच, ७/१२ बंद करून सीटीएस नोंदीनुसार शाळेचे नाव कायम ठेवण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण केली जाईल. दोषींवर कडक कारवाई केली जाईल.

**- विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड.**

## राष्ट्रीय पातळीवरील नेटबॉल स्पर्धेत आयुष येरणेची निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, राजुरा (चंद्रपूर) :** मानवी जीवनात समाजात वावरताना विविध प्रकारच्या माध्यमातून उज्वल यश संपादन करता येतो अशाच प्रकारे राजुरा शहरातील क्रीडा क्षेत्रातील उतुंग भरारी घेऊन आपल्या शहराचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्वल करणाऱ्या कुमार आयुष गजानन येरणे हा राजुरा, येथील एक उगवता भारतीय नेटबॉल खेळाडू आहे, ज्याने १४ वर्षांखालील गटात भारतीय नेटबॉल संघात प्रतिनिधित्व केले आहे. आणि त्यात सुवर्णपदक मिळवले. भविष्यातील युवा खेळाडूना प्रेरणादायी, मार्गदर्शित आशा निर्माण झाली असून गौरवाची आणि सन्मानाची बाब आहे. म्हणून त्याचा क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल आई-वडिलांसह आयुषचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रामुख्याने उपस्थित माजी आमदार ॲड. वामनराव चटप, राजुरा, मारोतराव येरणे, कपिल इद्दे, उपनगराध्यक्ष दिलीप देरकर, नगरसेवक रमेश नळे, नगरसेवक किशोर हिंगाने, नगरसेवक स्वप्नील मोहुर्ले, बळीराम खुजे, घनश्याम खनके, भाऊजी कन्नाके, मधुकर चिंचोलकर, सुरेश चौधरी, गजानन येरणे, अनिल बाळसराफ, सौरभ मादासवार सत्कारस्थळी उपस्थित होते.

# कॉपीची कुप्रथा !



आपल्याकडे फेब्रुवारी - मार्च हा परीक्षांचा काळ असतो. या महिन्यात परीक्षा पार पाडण्याची जणू परंपराच आहे. दहावी - बारावी या बोर्डाच्या परीक्षा याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय, मंथन यासारख्या स्पर्धा परीक्षा देखील याच काळात होतात. यावर्षी बारावीची बोर्ड परीक्षा १० फेब्रुवारी पासून सुरू झाली असून ती ११ मार्चला संपणार आहे तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतात. विद्यार्थ्यांच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात. दरवर्षी लाखो विद्यार्थी या परीक्षेला बसतात. यावर्षीही लाखो विद्यार्थी दहावी - बारावीची परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वर्षभर मन लावून अभ्यास केलाय ते विद्यार्थी या परीक्षांना बेधडकपणे सामोरे जातात मात्र ज्या विद्यार्थ्यांचा पुरेसा अभ्यास झाला नाही ते विद्यार्थी गैरमार्गाने ही परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रयत्न करतात. त्यातीलच एक गैरमार्ग म्हणजे कॉपी. दहावी बारावीच्या परीक्षेत दरवर्षी हजारो विद्यार्थी कॉपी करताना आढळतात. काहींवर कारवाई होते तर काहींना समज देऊन सोडून दिले जाते मात्र कॉपीची ही किड मुळापासून उखडून टाकली जात नाही. कॉपी ही आपल्या शिक्षण व्यवस्थेला लागेलेली किड आहे. वर्षभर अभ्यास न करता परीक्षेच्या दिवशी कॉपी करून उत्तीर्ण होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. ही धोक्याची घंटा आहे म्हणूनच खुद्द पंतप्रधानांना देखील यात लक्ष घालावे लागले होते. मागील वर्षी मन की बात या आपल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी याच विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना पंतप्रधानांनी कॉपी केल्याने आयुष्य घडवता येत नाही असा कानमंत्र दिला होता. कॉपी करून आपण एखादी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर अपार मेहनतच करावी लागते. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही असा संदेशही पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना दिला होता मात्र विद्यार्थ्यांनी पंतप्रधानांचा हा संदेश अंमलात आणला नाही असेच म्हणावे लागेल कारण सध्या चालू असलेल्या बारावीच्या परीक्षेत राज्यातील अनेक भागात मास कॉपी झाल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. बीड, जालना यासारख्या शहरात कॉपीमुक्त परीक्षा या शिक्षण विभागाच्या अभियानाला हरताळ फासला गेला. अनेक परीक्षा केंद्रावर विद्यार्थी कॉपी करताना आढळले. काही परीक्षा केंद्रावर मास कॉपी होत असल्याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला. याप्रकरणी काही पर्यवेक्षक आणि केंद्र संचालकांवर शिक्षण विभागाने कारवाई देखील केली आहे. दहावी - बारावी परीक्षेत कॉपी होऊ नये यासाठी शिक्षण विभाग विविध पावले उचलत असताना विद्यार्थ्यांकडून त्यास पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असेच म्हणावे लागेल. दरवर्षी कॉपी करणाऱ्या मुलांची संख्या वाढतच चालली आहे. कॉपीची कुप्रथा कमी होण्याऐवजी वाढतच चालली आहे. वर्षभर अभ्यास न करणारे विद्यार्थी कॉपीच्या या कुप्रथेचे आवर्जून पालन करतात. काही ठिकाणी तर काही शाळा आणि संस्था देखील निकाल चांगला लागावा म्हणून या कुप्रथेला प्रोत्साहन देतात. काही पालकही आपल्या पाल्यांना कॉपी पुरवण्यासाठी जीवाचे रान करतात. शाळेच्या, परीक्षा हॉलच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी तोबा गर्दी उसळते. झेरॉक्स दुकानांवर देखील तेवढीच गर्दी असते. अर्थात परीक्षेत कॉपी होऊ नये म्हणून प्रशासन सर्वोतोपरी प्रयत्न करते हे मान्यच करावे लागेल. राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हावी यासाठी प्रशासनाकडून विविध प्रकारचे अभियान राबवले जाते. भरारी पथक हे त्यापैकीच एक अभियान. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना काही अधिकारी बोर्डाकडून नेमले जातात. हे अधिकारी परीक्षा केंद्रावर अचानक भेटी देऊन परीक्षा केंद्रावर धाक बसवतात. कॉपी करताना कोणी विद्यार्थी आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाते. त्यांचे थेट निलंबन केले जाते. पण कॉपी बहाद्दरांना तुरुंगात टाकण्याची तरतूद आपल्याकडील कायद्यात नाही मात्र देशातील काही राज्यात कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तुरुंगात पाठवण्याचा कायदा आहे. आपल्याकडे देखील आता कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांना वचक बसावा आणि राज्यात कॉपीमुक्त परीक्षा व्हाव्यात यासाठी राज्यसरकार प्रयत्न करत आहे. त्यासाठी त्यांनी अनेक कठोर निर्णय घेतले आहेत. कॉपीमुक्त अभियानासाठी राज्यसरकार जे प्रयत्न करीत आहे ते स्वागतार्ह असले तरी कठोर कायदे करूनच कॉपिला आळा घालता येईल असे नाही तर कॉपी करू नये यासाठी विद्यार्थ्यांचे प्रबोधनही करायला हवे. कॉपी करणारा विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकतो मात्र जीवनाच्या परीक्षेत तो उत्तीर्ण होऊ शकत नाही. जीवनाच्या प्रत्येक पावलावर परीक्षा असतात . त्यात उत्तीर्ण होण्यासाठी कॉपी नव्हे तर कठोर मेहनतच घ्यावी लागते. कठोर मेहनतीशिवाय फळ मिळत नाही. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर कॉपिसारख्या कुप्रथेला मूठमाती द्यावीच लागेल.

**- श्याम ठाणेदार**

# व्हॅलेंटाईन डे : प्रेमाचा दिवस की माणुसकीची आठवण?



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**



फेब्रुवारीचा महिना आला की हवेत एक वेगळीच ऊब पसरते. गुलाबांची पाकळी, चॉकलेट्सची गोडी, शब्दात न मावणाऱ्या भावना आणि डोळ्यांत साठलेली स्वप्नं. या साऱ्यांचा एकत्रित उत्सव म्हणजे व्हॅलेंटाईन डे. काहींसाठी तो फक्त एक दिवस असतो पण अनेकांसाठी तो संपूर्ण आयुष्याची आठवण करून देणारा क्षण असतो. प्रेम म्हणजे केवळ गुलाब, कार्ड्स आणि सोशल मीडियावरचे स्टेटस नाही, तर तो माणसाच्या अस्तित्वाचा आत्मा आहे, जो श्वासासोबत आत जातो आणि नात्यांमधून बाहेर प्रकट होतो. प्रेम हे कोणत्याही एका दिवसापुरते मर्यादित नसते. तरीही व्हॅलेंटाईन डे चे महत्त्व नाकारता येत नाही. कारण हा दिवस आपल्याला थांबवतो धावपळीच्या, स्वार्थी, स्पर्धात्मक जगात थोडा वेळ स्वतःकडे आणि आपल्या माणसांकडे पाहायला भाग पाडतो. आपण प्रेम करतो का? यापेक्षा आपण प्रेम व्यक्त करतो का? हा प्रश्न या दिवशी अधिक ठळक होतो.

आजच्या काळात प्रेमालाही बाजारपेठेचा रंग चढला आहे. गिफ्ट्सची किंमत, रेस्टॉरंट्सचे पॅकेजेस, सोशल मीडियावरील 'परफेक्ट कपल' फोटो या सगळ्यात प्रेम हरवत चालले आहे का, असा प्रश्न अनेकांना पडतो. पण प्रेम कधीच वस्तू नव्हते आणि कधीच होणार नाही. प्रेम म्हणजे दोन माणसांमधील न दिसणारा करार एकमेकांना समजून घेण्याचा, स्वीकारण्याचा आणि आयुष्याच्या प्रत्येक वळणावर साथ देण्याचा. भारतीय संस्कृतीत प्रेमाला नेहमीच गहिरे, शांत, संयमी रूप दिले गेले आहे. सावित्रीचे सत्यवानावरील प्रेम, राधा-कृष्णाची अध्यात्मिक जवळीक, मीरा आणि विठ्ठलाचे भक्तिपूर्ण नाते ही प्रेमाचीच विविध रूपे आहेत. आज मात्र प्रेमाला फक्त रोमँटिक चौकटीत अडकवले जाते. प्रत्यक्षात प्रेम हे आईच्या काळजीत असते, वडिलांच्या न बोलणाऱ्या त्यागात असते, मित्राच्या खांद्यावरच्या आधारात असते आणि वृद्धांच्या डोळ्यातल्या शांततेत असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने प्रेमाचा हा व्यापक अर्थ पुन्हा एकदा समजून घेण्याची गरज आहे. प्रेम म्हणजे केवळ 'तू माझा किंवा माझी' एवढेच नव्हे, तर 'मी तुझ्यासाठी आहे' हे निःस्वार्थी भावनेतून उमटलेले वाक्य आहे. प्रेमात अधिकार असतो, पण मालकी नसते. प्रेमात अपेक्षा असतात, पण अटी नसतात. प्रेमात राग असतो, पण तोही जपणुकीचा असतो. आजच्या तरुणाईवर अनेकदा प्रेमाबाबत आरोप केले जातात की ते उथळ आहे, क्षणिक आहे, दिखाऊ आहे. पण सत्य असे आहे की आजची पिढी प्रेम व्यक्त करण्याचे नवे मार्ग शोधत आहे. त्यांच्या भाषेत प्रेम आहे, त्यांच्या संगीतामध्ये प्रेम आहे, त्यांच्या कविता आणि मेसेजेस मध्ये प्रेम आहे. दोष प्रेमाचा नाही, तर प्रेम समजून न घेणाऱ्या समाजाचा आहे. प्रेमाला विरोध करणारे अनेक आवाज आजही समाजात आहेत. व्हॅलेंटाईन डे म्हणजे 'पाश्चात्त्य संस्कृती' असा शिक्का मारून प्रेम व्यक्त करणाऱ्यांना दोषी ठरवले जाते. पण प्रेमाला संस्कृती नसते; प्रेम ही माणसाची मूलभूत गरज आहे. संस्कृती जर प्रेमाला नाकारत असेल, तर त्या संस्कृतीला पुन्हा तपासण्याची गरज आहे. प्रेम हे बंडखोर असते ते जाती, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती या सगळ्या भिंती ओलांडते. म्हणूनच कदाचित प्रेमाला नेहमीच विरोध झाला आहे. कारण प्रेम प्रश्न विचारते, रूढी मोडते आणि माणसाला माणूस म्हणून उभे करते. व्हॅलेंटाईन डे हा त्या बंडखोरीचा शांत, सुंदर उत्सव आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात नात्यांना वेळ देणे कठीण होत चालले आहे. मोबाईलमध्ये हजारो संपर्क असले तरी मनात जवळीक कमी होत आहे.

अशा वेळी व्हॅलेंटाईन डे आपल्याला आठवण करून देतो की, प्रेमासाठी वेळ काढावा लागतो, संवाद साधावा लागतो, आणि कधी कधी स्वतःला बाजूला ठेवावे लागते. खरे प्रेम मोठ्या शब्दांत व्यक्त होत नाही; ते छोट्या कृतींमध्ये दिसते. थकलेल्या जोडीदारासाठी केलेला चहा, मित्राच्या अपयशात दिलेली शांत साथ, आई-वडिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणणारी एक साधी भेट, हेच प्रेमाचे खरे क्षण आहेत. व्हॅलेंटाईन डे हा अशा क्षणांची उजळणी करण्याचा दिवस आहे. आज प्रेमालाच टिकून राहण्यासाठी संघर्ष करावा लागतो. नाती तुटतात, विश्वास ढासळतो, आणि लोक एकमेकांपासून दूर जातात. पण तरीही प्रेम संपत नाही. कारण प्रेम हे शेवटी आशेवर उभे असते उद्या सगळं बरं होईल या विश्वासावर. व्हॅलेंटाईन डे हा त्या आशेचा उत्सव आहे. प्रेम हे परिपूर्ण नसते. त्यात चुका असतात, मतभेद असतात, वेदना असतात. पण तरीही प्रेम सोडून देण्यापेक्षा त्याला समजून घेणे महत्त्वाचे असते. प्रेम म्हणजे प्रत्येक वेळी जिंकणे नाही, तर कधी कधी हरूनही एकत्र राहणे असते.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने समाजाने एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, प्रेमाला स्वीकारले तरच माणुसकी टिकेल. द्वेष, हिंसा, असहिष्णुता यांच्यावर मात करण्याची ताकद फक्त प्रेमात आहे. प्रेमाशिवाय कोणतीही क्रांती टिकू शकत नाही, कोणतीही संस्कृती फुलू शकत नाही. आज गरज आहे ती प्रेमाला मोकळा श्वास घेऊ देण्याची. प्रेम करणाऱ्यांना प्रश्न विचारण्याऐवजी त्यांना समजून घेण्याची. कारण प्रेम दडपले गेले की ते वेदनेत बदलते, आणि स्वीकारले गेले की ते जीवनात बदल घडवते. व्हॅलेंटाईन डे म्हणजे फक्त प्रेमींचा दिवस नाही; तो माणसाचा दिवस आहे. आपल्या आयुष्यातील प्रत्येक नात्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा, प्रेम व्यक्त करण्याचा आणि थोडे अधिक माणूस होण्याचा दिवस आहे.

शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, प्रेम नेहमी जवळ असतेच असे नाही. कधी ते अंतरात असते, कधी आठवणीत, कधी न बोललेल्या शब्दांत. विरह म्हणजे प्रेमाचा अभाव नसतो; तो तर प्रेमाचीच सर्वात प्रामाणिक परीक्षा असते. ज्याची ओढ लागते, ज्याची आठवण मनाला थकवते आणि तरी ही ज्याच्यासाठी मन प्रार्थना करत राहते, तेच खरे प्रेम. काही प्रेमकथा हातात हात घालून पूर्ण होतात, तर काही डोळ्यांत पाणी ठेवून अपूर्णच राहतात. पण अपूर्णतेतही जे जिवंत राहते, जे काळाच्या ओघातही मनात सलत राहते, तेच प्रेम अमर असते. कारण प्रेम मिळण्यात नसते; ते थांबण्यात, वाट पाहण्यात आणि आठवणी जपण्यात असते. व्हॅलेंटाईन डेच्या गुलाबामागे कधी कधी एक न बोललेली हुरहूर असते, चॉकलेटच्या गोडीमागे एखादी न व्यक्त झालेली वेदना असते. तरीही माणूस प्रेमावर विश्वास ठेवतो, कारण विरहही सांगून जातो की, आपण कुणावर तरी मनापासून प्रेम केले होते.

प्रेम जवळ असो वा दूर, समोर असो वा आठवणीत ते जर खरं असेल तर ते मनाला अधिक माणूस बनवतं आणि म्हणूनच, प्रेम हरवले तरी त्याची आठवण जपा; कारण काही नाती आयुष्यात साथ देत नाहीत, पण आयुष्यभर अर्थ देऊन जातात. प्रेमाला एक दिवस पुरेसा नसतो, पण एक दिवसही निरर्थक नाही. कारण कधी कधी एक दिवसच आयुष्यभराची दिशा ठरवतो. प्रेम करा, व्यक्त करा आणि जपा, कारण प्रेम हेच खरं शाश्वत सत्य आहे. तुमचं आयुष्य प्रेमाने, आपुलकीने आणि सुंदर नात्यांनी नेहमी फुलत राहो, भावनांना शब्द मिळोत आणि शब्दांना अर्थ. व्हॅलेंटाईन डे च्या मनापासून शुभेच्छा!

*प्रेम करा...*
*जुळले नाही तरी चालेल,*
*भेट झाली नाही तरी चालेल*
*पण मनातलं प्रेम खोटं ठरू देऊ नका.*
*कारण विरहातही जे उजळतं,*
*तेच खरं, शाश्वत प्रेम असतं.*

## औदंड

जागाअसेमर्यादित
इच्छुक अति प्रचंड
अपेक्षित हे सकला
होणारं निश्चित बंड

नक्की येवू जिंकून
अपेक्षासुध्दा उदंड
अपक्ष म्हणून खडे
थोपटून आपलेदंड

आवर असे कठिण
सत्तेचा विचित्र कंड
सांगणे केवळ सोपे
एकजूट ठेवे अखंड

नाकारले तिकीट रे
दिला कसा उग्र दंड
घाम गाळला सतत
कामेकेलेली औदंड

पदरमोड करे काही
ना मागता पक्ष फंड
आव्हान पक्षश्रेष्ठींस
पहावे कर्तृत्वउतरंड

कामआता रे क्लिष्ट
कसे शांतकरावे बंड
अन्यथा बदली चित्र
अकारण होई कदंड

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## पिक विमा मिळण्यासाठी
## काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१३, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांची सर्व पिके होत्याची नव्हती झाली आहेत. प्रचंड काबाडकष्ट करून व अतोनात खर्च करून शेतकऱ्यांच्या हातात काहीच लागले नाही. अशा परिस्थितीत शासनाकडून शेतकऱ्यांना भरघोस आर्थिक मदत मिळणे अपेक्षित होते होती परंतु ती अत्यंत तुटपुंजी रक्कम मिळालेली आहे, यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत असून आत्महत्या करीत आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला खरीप पिक विम्याची गरज आहे.

परंतु खरीप पिकाचा मौसम संपून गेला तरी पालम तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्याप यावर्षीचा खरीप पिक विमा भेटलेला नाही. तरी सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ पिक विमा मिळवून द्यावा, तसेच मागील तीन वर्षापासून रखडलेला इ.स. २०२२, २३ , २४ व २५ यावर्षीचा पिक विमा सुद्धा देण्यात आलेला नाही तो ही त्वरित देण्यात यावा अशा आशयाचे निवेदन भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, पालम शाखेच्या वतीने तहसीलदारांना आज दिनांक १३ फेब्रुवारी रोजी देण्यात आले.

# सार्वजनिक ठिकाणी असले चाळे नकोच !

काळ जसा सरत गेला तसा देश आधुनिकीकरणाकडे मार्गक्रमण करू लागला. माणसाचे राहणीमान उंचावू लागले. पूर्वी कधीतरी लग्न समारंभात किंवा मोठ्या कार्यक्रमात दिसणारी सुटाबुटातील माणसे आता लोकल ट्रेनमध्येही दिसू लागली आहेत. पूर्वी खासगी गाड्या कमी असल्याने रस्ते ओस असायचे, आता शहरासारख्या ठिकाणी गाड्या एव्हढ्या वाढल्या आहेत कि रस्ते कमी पडू लागले आहेत. लँडलाईन, पीसीओ, पेजर जाऊन मोबाईल आले, आता त्यातही क्रांती होऊन सर्वांना परवडणारे स्मार्ट फोन प्रत्येकाकडे आले.

घरोघरी स्मार्ट टीव्ही आले, फ्रिज आणि धुलाई यंत्र आले. शहरांमध्ये आता चाळींतूनही घरोघरी वातानुकूलित यंत्रे(एसी) बसवली जाऊ लागली आहेत. प्रत्येकाच्या हाती स्मार्ट फोन आला आणि त्यामध्ये अनलिमिटेड डाटा पॅकही आला. सोशल मीडियाचे अनेक प्लॅटफॉर्म्स तयार झाले त्यावर प्रतिदिन रेंगाळणाऱ्यांची संख्याही वाढली, शेजारपाजारचे ४-५ मित्र दुरावले आणि सामाजिक माध्यमांवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स जोडले गेले. दुरदर्शनचा काळ संपला, वेगवेगळे चॅनल्स आले, आता तर ओटीटी प्लॅटफॉर्म्स सुद्धा आले. युट्युबचा पसारा अवास्तव वाढला आणि या युट्युबवरील चित्रपट, मालिका, खेळांचे सामने, खाद्यपदार्थांच्या रेसिपी, इंटरनेटच्या साहायाने स्मार्ट टीव्हीवर मोठ्या स्क्रीनवर पाहण्याची सुविधा उपलब्ध झाली. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर नवनवीन चित्रपट आणि वेब सिरीज यांचे अक्षरशः पेव फुटले. एक काळ असा होता जेव्हा चित्रपटात प्रेमप्रसंग दाखवण्यासाठी दोन फुलांचा वापर केला जात असे, आता काळ इतका पुढे गेला आहे की चित्रपट परीक्षण मंडळाकडून 'अ प्रमाणपत्र' घेऊन शयनगृहातील प्रणयदृश्ये खुलेआमपणे पडद्यावर दाखवली जाऊ लागली आहेत. आयटम साँग , चुंबनदृश्ये, शिव्यांचा मुक्त वापर आणि भडक दृश्यांशिवाय हल्लीचे चित्रपट पूर्णत्वाला येतच नाहीत. ओटीटी प्लॅटफॉर्म्सना सेन्सॉरचेही बंधन नसल्याने येथील प्रौढांसाठी बनवण्यात आलेल्या वेब सिरीज शाळेतील मुलेही आपल्या स्मार्ट फोन्सवर चवीने पाहू लागली आहेत. चित्रपटातील अभिनेत्रींचा तोकड्या कपड्यांतील वावर आताच्या तरुणींना स्टाईल स्टेटमेंट वाटू लागले आहे. त्यामुळे महाविद्यालयात आणि कार्यालयांत तोकडे कपडे घालून जाणाऱ्या अनेक तरुणी प्रतिदिन बस, रेल्वे आणि रहदारीच्या ठिकाणी दिसू लागल्या आहेत. पौगंडावस्थेतच मुलांच्या हाती स्मार्ट फोन्स आल्याने त्यावर पॉर्न चित्रपट पाहणाऱ्या मुलांचे प्रमाणही गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहे. पूर्वी कधीतरी निर्जन स्थळी दिसणारी प्रेमी युगुले आज गर्दीच्या, रहदारीच्या ठिकाणी सर्रासपणे दिसू लागली आहेत. ट्रेन, बस, पादचारी पूल, स्कायवॉक, बगीचे, तळी, नदी-समुद्र किनारे, बस आणि रेल्वे स्थानक यांवर यांचे चाळे सर्वांदेखत सुरु असतात.

यामध्ये १५-१६ वर्षांच्या मुला-मुलींचाही सहभाग असतो. रेल्वे, बसमध्ये आजूबाजूला बसलेल्यांचे जराही भान न राखता प्रेमात(कि शारीरिक आकर्षणात ?) आकंठ बुडालेली टीनेजर जोडपीही आता बऱ्याच प्रमाणात दिसू लागली आहेत. चित्रपट-मालिकांमध्ये दाखवण्यात येणारी भडक प्रणयदृश्ये, मुलांच्या हाती आलेले स्मार्ट फोन्स, त्यांवरील इंटरनेटचा स्वैर वापर, पालकांनी मुलांना दिलेली अवास्तव मोकळीक आणि मुलांवरील पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव ही यामागील प्रमुख कारणे आहेत. सध्या सुरु असलेला 'व्हॅलेंटाईन वीक' म्हणजे यांच्यासाठी पर्वणीच आहे. रोजच्या रहदारीच्या वाटेवरील यांचे चाळे पाहून सभ्य माणसे त्यांच्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करताना आढळतात, पालक आपल्या लहान मुलांची नजर त्यांच्यावर पडणार नाही याची काळजी घेताना दिसतात; मात्र त्यांना हटकण्याचा किंवा जाब विचारण्याचा प्रयत्न करताना कुणीच दिसत नाहीत. एखादी संस्कृतीरक्षक संघटना यांच्यावर कधीतरी धडक कारवाई करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा समाजातील तथाकथित प्रेमाचे ठेकेदार जागे होतात आणि आणि या चाळ्यांना विरोध करणाऱ्यांना तालिबान्यांची उपमा देऊन यांच्यावर प्रसिद्धी माध्यमांतून गळे काढतात. बऱ्याचदा पोलीसही या चाळ्यांकडे दुर्लक्ष करताना आढळतात. परिणामी या आधुनिक प्रेमवीरांचे धाडस दिवसागणिक वाढत चालले आहे. यामध्ये आपली मुले नाहीत, म्हणून आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करत असू, तर अन्य कुठेतरी आपली मुलेसुद्धा हेच करत नसतील याची शाश्वती आपण देऊ शकतो का ? आपण भारतात राहतो. येथील संस्कृती असल्या स्वैराचाराला मुळीच मान्यता देत नाही. त्यामुळे संस्कृतीला काळिमा फासणारे कृत्य रोखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मरळगोई-विंचूर रस्त्यावर काटेरी झुडपांचा विळखा

### मरळगोई चौफुलीवर गतिरोधक बसविण्याची ग्रामस्थांची आग्रही मागणी



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** मरळगोई ते विंचूर या मुख्य मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या काटेरी झुडपांमुळे वाहतुकीला गंभीर अडथळा निर्माण झाला आहे. या झुडपांमुळे रस्ता अरुंद झाला असून, शालेय विद्यार्थ्यांसह वाहनधारकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परिसरात बिबट्याचा वावर वाढलेला असतानाच प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अपघाताची टांगती तलवार कायम असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**मुख्य समस्या काय आहेत?**

अपघातांना निमंत्रण : विंचूर आणि लासलगाव या मोठ्या बाजारपेठांकडे जाण्यासाठी हा मार्ग महत्त्वाचा आहे. मात्र, दुतर्फा झुडपांमुळे समोरून येणारे वाहन दिसत नाही. मोठे वाहन समोर आल्यास दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून रस्त्याखाली उतरावं लागतं.

**विद्यार्थ्यांची ससेहोलपट :** शाळेत जाणाऱ्या मुलांची या मार्गावर मोठी वर्दळ असते. समोरून वाहन आल्यास विद्यार्थ्यांना अक्षरशः काटेरी झुडपात शिरावं लागतं, ज्यामुळे जखमा होण्याचे प्रमाण वाढले आहे.

**बिबट्याची दहशत :** सध्या या भागात बिबट्यांचा वावर वाढला आहे. रस्त्यावरील ही दाट झुडपे बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा ठरत असल्याने पादचारी आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**मरळगोई चौफुलीचा प्रश्न गंभीर**

नुकतेच मरळगोई-विंचूर आणि भरवस फाटा-लासलगाव या रस्त्यांचे नूतनीकरण झाले आहे. मात्र, मरळगोई चौफुलीवर यापूर्वी अनेक छोटे-मोठे अपघात झाले आहेत. नवीन गुळगुळीत रस्त्यामुळे वाहनांचा वेग वाढला असून, या ठिकाणी तातडीने गतिरोधक (Speed Breakers) बसवणे अनिवार्य झाले आहे. मोठ्या अपघाताची वाट न पाहता प्रशासनाने तात्काळ रस्त्यावरील काटेरी झुडपे हटवावीत आणि मरळगोई चौफुलीवर गतिरोधक बसवावेत.

**– चंद्रकांत आव्हाड (शिवव्याख्याते) व स्थानिक शेतकरी**

## भानेगावात वेकोलिच्या सीएसआर फंडातून ग्रीन जिमचे उदघाटन



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** सावनेर तालुक्यातील भानेगाव ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्रमांक ३ व ४ मध्ये वेकोलिच्या सीएसआर फंडातून ग्रीन जिमचे उदघाटन भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाणीचे उपक्षेत्रीय प्रबंधक शैलेशकांत पांडे यांच्या हस्ते शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले. भानेगाव ग्रामपंचायत हद्दीत भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाण कार्यरत आहे. गावातील भौतिक सुविधा लक्षात घेऊन सरपंच शालिनी चवरे यांनी वेकोलिच्या सीएसआर फंडातून विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय, प्रौढ व्यक्तिकरिता ग्रीन जिम, पिण्याच्या शुद्ध पाण्याचे आरोची मागणी केली होती. वेकोलिने सीएसआर फंडातून ग्रंथालय, ३ ग्रीन जिम आदि मंजूर केले.दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी रितसर ग्रीन जिमचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रामुख्याने सरपंच शालिनी चवरे, उपसरपंच सोनू बोरकर, ग्रामपंचायत सदस्य अश्विनी अभ्यंकर, दर्शना बोरकर, कमलेश भास्कर, पुष्पा जालंदर, मंगला पांडे, धीरज नागरकर, नितीन चव्हाण, सीमा चिकनकर, अरविंद तांडेकर, सरस्वती तांडेकर, मीना उके यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते सचिन नागरकर, सुमित चव्हाण, प्रशांत पाटील, अनिल धनवटे, सुभाष मेश्राम आदी उपस्थित होते. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा भानेगाव येथे ग्रंथालय इमारत तयार झाली असून लवकरच ग्रंथालयाचे रितसर उदघाटन करणार असल्याचे सरपंच शालिनी चवरे यांनी सांगितले, शिवाय पिण्याच्या शुद्ध पाण्याचे आरोला लवकरच मंजुरी मिळणार असल्याचेही सांगितले.

## महापौर व उपमहापौरांनी स्वीकारला पदभार

### जोरगेवार गटाचा बहिष्कार, मुनगंटीवार - जोरगेवार संघर्ष कायम




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव व चंद्रपूर महानगरपालिका सभागृहातील सत्ता पक्षनेते चंद्रशेखर शेट्टी यांनी दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मनपा मुख्यालयात झालेल्या पदग्रहण कार्यक्रमात आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत पदभार स्वीकारला. परंतु यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या गटातील नगरसेवकांनी आमच्या नेत्याला बोलावले नाही म्हणून आक्षेप घेत बहिष्कार घातल्याने परत एकदा मुनगंटीवार – जोरगेवार वादाला पुन्हा तोंड फुटले.

चंद्रपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील प्रशासकीय इमारतीमध्ये झालेल्या या कार्यक्रमात आयुक्त अकुनूरी नरेश यांनी नवनियुक्त महापौर व उपमहापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व त्यानंतर लगेच आयुक्तांच्या हातून पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारला. कार्यक्रमास नवनियुक्त सदस्य, पदाधिकारी मनपा अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१७ नगरसेवकांची अनुपस्थिती**

महानगरपालिकेत सत्ता स्थापन करुन भाजपचा झोंडा तर फडकला, पण विजयाचा हा गुलाल सुकण्यापूर्वीच पक्षांतर्गत गटबाजीने जोर धरला आहे. नवनियुक्त महापौर संगीता खांडेकर यांनी पदभार स्वीकारला. मात्र, या आनंदाच्या प्रसंगी भाजपमधील जोरगेवार गट अनुपस्थित राहिला. मुनगंटीवार समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करीत जल्लोष केला.

मात्र, हा आनंद सर्वसमावेशक नव्हता. स्थानिक भाजप आमदार किशोर जोरगेवार यांना या अधिकृत कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले नसल्याचा खळबळजनक आरोप नगरसेवक सुभ कासनगोट्टूवार यांनी थेट मुनगंटीवार यांचेवर केला. या अपमानाचा निषेध म्हणून जोरगेवार समर्थक नगरसेवकांनी कार्यक्रमावर बहिष्कार टाकला. भाजपाचेच नगरसेवक आपल्याच महापौराच्या कार्यक्रमाला गैरहजर राहिल्याने वेगवेगळ्या चर्चेला पेव फुटले आहे.

## ठाणे जिल्ह्याच्या बळकटी करणासाठी १७०० कोटींच्या आराखड्यास वाढीव निधी देणार - मुख्यमंत्री

### जिल्हा वार्षिक योजना (२०२६-२७) राज्यस्तरीय बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, ठाणे :** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत ठाणे जिल्ह्याच्या बळकटीकरणासाठी तयार करण्यात आलेल्या रु.१७०० कोटी रुपयांच्या प्रारूप आराखड्यास मागणीपेक्षा वाढीव निधी देण्यात येईल. ठाणे जिल्ह्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे स्पष्ट आश्वासन मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) प्रारूप आराखड्यांना अंतिम स्वरूप देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे, ठाणे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तसेच मिरा भाईंदचे आमदार नरेंद्र मेहता, कल्याण पूर्व च्या आमदार सुलभा गायकवाड, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.कैलास पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी ठाणे जिल्हाधिकार्यालयाच्या ५ व्या मजल्यावरील समिती सभागृहात उपस्थित होते.

दि.१२ फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा वार्षिक योजना बैठकीत सन २०२६-२७ साठीचा रु.१७०० कोटी रुपयांचा प्रारूप आराखडा मंजूर करण्यात आला होता. श्री. शिंदे यांनी हा आराखडा राज्यस्तरीय बैठकीत सादर केला.जिल्हा नियोजन समितीने तयार केलेल्या या आराखड्यात रु.६६०.३५ कोटींचा मूळ प्रस्ताव समाविष्ट होता. विविध विभाग व यंत्रणांच्या मागण्यांचे विश्लेषण करून व्यवहार्य ठरणारी रु.१०३९.६५ कोटींची अतिरिक्त मागणी प्रस्तावित करण्यात आली. अशा प्रकारे एकूण रु.१७०० कोटींचा आराखडा राज्य शासनाकडे सादर करण्यात आला.सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी सुरुवातीला ठाणे जिल्ह्यास रु.८०५.८४ कोटींची तरतूद कळविण्यात आली होती. त्यानंतर राज्यस्तरीय बैठकीत रु.१९९.१६ कोटींची वाढ देण्यात आली. परिणामी, ठाणे जिल्ह्यासाठी रु. १००५ कोटींचा अंतिम नियतव्यय मंजूर करण्यात आला. सन २०२४-२५ च्या तुलनेत ही वाढ सुमारे ६७ टक्के होती.सन २०२५-२६ या वर्षात विविध नाविन्यपूर्ण योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ठाणे येथील तालुका क्रीडा संकुलात रु.९९.९८ लाख खर्चून जिम्नॅस्टिक खेळासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उभारण्यात येत आहेत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नागरिक व पर्यटकांच्या सोयीसाठी रु.२९८.९६ लाख खर्चून सेल्फ-क्लिनिंग इलेक्ट्रॉनिक ईको-टॉयलेट्स उभारण्यात येत आहेत. शहापूर तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात रु.१२५लाख खर्चून १० खाटांचे आधुनिक 'न्यूट्रिशन रिहॅबिलिटेशन सेंटर' (एनआरसी) सुरू करण्यात येत आहे. मुरबाड तालुक्यातील नागरिकांना शासकीय सेवा सुलभपणे उपलब्ध व्हावी, यासाठी रु.१३८.१७ लाख खर्चून आधुनिक सेतू सुविधा केंद्र उभारण्यात येत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये रु.१०० लाख खर्चून सौरऊर्जेवर चालणारे दिवे बसविण्यात येत आहेत. मिशन भरारीया नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील इयत्ता ५ वी ते ८ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांना Indian Space Research Organisation (ISRO) तसेच देशातील नामांकित वैज्ञानिक संस्थांना शैक्षणिक भेटींचे आयोजन करण्यात येणार आहे. यासाठी रु.५० लाखांचा निधी प्रस्तावित आहे.तसेच भूमाता वनधन केंद्र येथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना जंगल, जैवविविधता आणि आदिवासींचा सांस्कृतिक वारसा अनुभवता यावा यासाठी रु.६५.५० लाख खर्चून 'निसर्ग संवाद संस्कृती संग्रहालय' उभारण्यात येणार आहे.

वर्तकनगर, ठाणे येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी ग्रंथालयात रु.१५९.९२ लाख खर्चून आधुनिक बैठक व्यवस्था आणि तंत्रज्ञानाधारित ई-ग्रंथालय सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.ठाणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून जिल्ह्याच्या बळकटी करणासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

## शहापुराचा शैक्षणिक सुवर्णक्षण, नवोदय विद्यालयाचा मार्ग मोकळा



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१३, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंदाची बातमी आहे. शहापूर तालुक्यात लवकरच जवाहर नवोदय विद्यालय सुरू होणार असून त्यासाठी भातसानगर येथील जमीन बिनशर्त मंजूर करण्यात आली आहे. जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला अंतिम मान्यता देण्यात आली.

**जिल्हा विभाजनानंतर निर्माण झालेली अडचण**

२०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर स्वतंत्र जिल्हा झाला. त्यानंतर ठाणे जिल्ह्यासाठी स्वतंत्र नवोदय विद्यालय उपलब्ध नव्हते. परिणामी शहापूर, मुरबाड, भिवंडी, अंबरनाथ आणि कल्याण तालुक्यातील विद्यार्थ्यांना पालघर जिल्ह्यातील विद्यालयात जावे लागत होते.

**सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश**

शहापूर येथेच नवोदय विद्यालय सुरू व्हावे. यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र विशे यांनी दि.०७ डिसेंबर २०१९ रोजी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत ठराव मांडून मागणी केली होती.या मागणीस माजी आमदार पांडुरंग बरोरा, भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा) आणि कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे यांनीही सातत्याने पाठपुरावा केला.

**भातसानगर येथे उभारणीचा मार्ग मोकळ**

भातसा येथील जलसंपदा विभागाच्या जमिनीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला होता. आता त्या जमिनीला सिंचन विभागाकडून बिनशर्त मंजुरी मिळाल्याने विद्यालयाच्या प्रत्यक्ष उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

**ग्रामीण विद्यार्थ्यांना मोठा फायदा** सीबीएसई बोर्डाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने प्रत्येक जिल्ह्यात एक नवोदय विद्यालय सुरू करण्याचे धोरण ठेवले आहे. सध्या जव्हार येथील नवोदय विद्यालयात सर्वाधिक विद्यार्थी शहापूर तालुक्यातून जात होते. आता शहापुरातच विद्यालय सुरू झाल्यास हजारो विद्यार्थ्यांना जवळच गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी मिळणार आहे. या घोषणेमुळे शहापूर तालुक्यातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षणप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

## आंबवली (बु.) येथे श्री विषवेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन




**अक्षराज : कृष्णा शावणपाटील**

**दि.१३, दापोली (रत्नागिरी) :** रत्नागिरी जिल्यातील, दापोली तालुक्यातील, आंबवली बु. येथे पांडवकालीन शिवमंदिरात दरवर्षी प्रमाणे यावर्षीही उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कोकणातील निसर्गसौंदर्याने नाटलेले शांत आणि सांस्कृतिक परंपरा जपणारे अशी या गावची ख्याती आहे. हिरव्यागार डोंगररांगा, नारळी, पोफळी, आणि आंब्याच्या बागा. मंद वाऱ्यासोबत दरवळणारा मातीचा सुगंध. केसरी नदीकाठी वसलेले हे गाव, व त्यांचे ग्रामजीवन त्यामुळे या गावाला विशेष ओळख लाभली आहे.

विशेषतः या गावातील श्री विषवेश्वर मंदीर हे पांडवानी अज्ञातवासात असताना एका रात्रीत हे बांधले आहे. अशी अख्यायिका आहे.

अशी सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या मंदिरात, रविवार, दि.१५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्री निमित्त उत्सव. भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील सर्व भाविक भक्तगणनानी, उपस्थित राहून कार्यक्रमांची शोभा वाढवावी. असे आवाहन, मौजे आंबवली बु. ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, विश्वेश्वर मंदिर समिती. आणि केळकर बंधू याच्याकडून करण्यात आले आहे. कार्यक्रमाची रूपरेषा सकाळी, १० वाजता महाआरती. ११ वाजता हळदीकुंकू समारंभ. दुपारी, १२.३० पासून महाप्रसाद असे आयोजन असून भाविकांनी, याचा लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रात भविष्यात काहीतरी नावीन्यपूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली - प्राचार्य



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१३, सुपा (अहिल्यानगर) :** न्यू इंग्लिश स्कूल सुपा येथील इयत्ता पाचवी ते नववीच्या जवळजवळ दीडशे विद्यार्थ्यांनी सातारा येथील रयत सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंट शैक्षणिक सहल दौरा केला. या शैक्षणिक भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे, प्रयोगांद्वारे शिकण्याची सवय वाढवणे आणि नवोन्मेषी विचारांना चालना देणे हा होता. केंद्रात विविध विज्ञान प्रयोग, आकर्षक मॉडेल्स, इनोव्हेशन हॉल तसेच तंत्रज्ञानाशी संबंधित प्रात्यक्षिके पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. विद्यार्थ्यांनी विविध मॉडेल्स प्रत्यक्ष हाताळून पाहिली. त्यामुळे विज्ञान हा केवळ पुस्तकातील विषय नसून तो दैनंदिन जीवनाशी जोडलेला आहे, याची जाणीव सर्वांना झाली. मार्गदर्शकांनी दिलेल्या सविस्तर माहितीमुळे विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी आत्मविश्वास आणि जिज्ञासा वाढीस लागली.

या भेटीमुळे विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भविष्यात काहीतरी नावीन्यपूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली. सहलीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक श्री जाधव एम.के, शिक्षकवृंद आणि व्यवस्थापन मंडळ यांचे सर्वांनी मनःपूर्वक आभार मानले. अशा ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, हे या भेटीतून स्पष्ट झाले. सहलीमध्ये सहभागी शिक्षक श्री बबन शिंदे, अभिजीत जाधव, संजय बर्डे, सुवर्णा पाडेकर, प्रतिभा फलके, रूपाली ढाकणे, अश्विनी हावरे, मनीषा गोत्राळ, संगीता चव्हाण, साधना थोरात, पुष्पा शिंदे इत्यादी सहभागी होते.

# तांदळाऐवजी रेशनकार्ड धारकांना गव्हासोबत मिळणार मका




## जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या मका खरेदी सुरू

३ महिने रेशनवर गव्हासोबत मका मिळण्याची शक्यता

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** राज्य शासनाकडून अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना गहू, तांदळाचे नियमित वाटप केले जाते. परंतु मार्च म हिन्यापासून रेशन कार्ड धारकांना स्वस्त धान्य दुकानातून तांदळा ऐवजी गव्हासोबत मका मिळणार आहे.

जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात आठ केंद्रावर मका खरेदी करण्यात येत आहे. ही खरेदी केलेली मका रेशनदुकानातून लाभार्थ्यांना दिली जाणार आहे. आतापर्यंत १५ हजार क्विंटल मका खरेदी करण्यात असून २८ फेब्रुवारी पर्यंत खरेदी सुरु राहाणार आहे. खरेदी करण्यात आलेली संपूर्ण मका लाभार्थ्यांना दिली जाणार असल्याने पुढील आहे.

अंत्योदय योजनेतील कुटुंबांना १० किलो मका व ११ किलो गहू मिळणार आहे. तर प्राध्यान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना प्रत्येकी दोन किलो गहू व एक किलो मका दिली जाणार आहे. जिल्ह्यात अंत्योदय योजनेचे ८७ हजार ६४ कार्डधारक आहेत, तर ३ लाख ८६ हजार ३४ लाभार्थी आहेत. प्राधान्य कुटुंब योजनेचे ६ लाख ३७ हजार ११४ रेशनकार्डधारक आहेत, तर २५ लाख ६३ हजार ९७१ लाभार्थी आहेत. जिल्ह्यात नगर, घारगाव, श्रीगोंदा, घोगरगाव, मिरजगाव, शेवगाव, पाथर्डी व कोपरगाव येथील फेडरेशन केंद्रावर मका खरेदी केली जात आहे. तर जामखेड व संगमनेर येथील केंद्रावर शेतकर्यांची नोंदणी झालेली नाही.

# तिखोल येथे सभामंडपाचे भूमिपूजन; विकासाच्या वचनाला नवी गती



**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील तिखोल (ता.पारनेर) येथे महादेव मंदिरासमोरील सभामंडप बांधकामाच्या कामाचे भूमिपूजन डॉ. प्रदीप दाते यांच्या हस्ते संपन्न झाले. आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या या कामामुळे गावाच्या धार्मिक व सामाजिक जीवनाला नवसंजीवनी मिळणार आहे.

या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर गावचे माजी सरपंच शिवाजी खिलारी, अक्षय गोरडे यांसह गावातील माजी सरपंच सुभाष ठाणगे, माजी उपसरपंच विठ्ठल ठाणगे, ग्रामपंचायत सदस्य राघू ठाणगे, नबाजी मंचरे, भाऊसाहेब ठाणगे, सखाराम मंचरे, पोपट मंचरे, शिवाजी धोंडिबा ठाणगे, अमोल ठाणगे, अशितोष ठाणगे, सतीश ठाणगे, गोरक्ष आग्रे, भास्कर ठाणगे, संदिप ठाणगे, आप्पा ठाणगे, रावसाहेब टिकल, रंगनाथ ठाणगे, महादू ठाणगे, आनंदा ठाणगे, बाळू ठाणगे, बाळासाहेब ठाणगे, भानुदास ठाणगे, सोनू मंचरे, नशीर तांबोळी, रामदास ठाणगे, बबन मेजर, विजय ठाणगे, हरिभाऊ ठाणगे, शाम ठाणगे, गणेश ठाणगे, भगवंत ठाणगे, नामदेव ठाणगे, भागा ठाणगे, अशोक ठाणगे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप दाते यांनी सांगितले की, मतदारसंघातील सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. आमदार काशिनाथ दाते यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण मतदारसंघात विविध विकासकामे गतीने सुरू असून प्रत्येक गावात मूलभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

राजकारण करताना समाजकारणाला प्राधान्य देत सर्वसामान्य नागरिक केंद्रस्थानी ठेवून काम करण्याची सरांची शिकवण अभिमानास्पद असून जनतेने दाखवलेला विश्वास कायम राखणे ही आमची नैतिक जबाबदारी आहे. या सभामंडपाच्या उभारणीमुळे ग्रामस्थांना धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार असून गावाच्या विकासाचा आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# ठाणे स्थानक बनले मृत्यूचे केंद्र?; ४ वर्षांत सर्वाधिक रेल्वे अपघातांची नोंद




**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, कळवा (ठाणे) :** मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील ठाणे स्थानकात प्रवासी मृत्यूंचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे. अपुऱ्या लोकल फेऱ्या, प्रचंड गर्दी आणि रखडलेले प्रकल्प यामुळे प्रवाशांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. २०२२ ते २०२५ दरम्यान सर्वाधिक मृत्यूंची नोंद ठाणे रेल्वे स्थानकात आढळून आली आहे.

कळवा-ऐरोली उन्नत मार्गिका आणि नवे ठाणे स्थानक प्रकल्प वर्षानुवर्षे अपूर्ण आहेत.पुनर्विकास प्रकल्पाबाबत ही अनिश्चितता आढळून आली आहे ज्याचा रेल्वे अपघातांवर परिणाम होतो. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील ठाणे स्थानक हे सर्वाधिक गर्दीच्या स्थानकांपैकी एक मानले जाते. मात्र गेल्या ४ वर्षांत उपनगरी रेल्वेमधील मृत्यूंची सर्वाधिक प्रकरणे याच स्टेशनवरून नोंदविण्यात आली आहेत.

अपुऱ्या लोकल फेऱ्या, गाड्यांचा वारंवार होणारा विलंब, प्रवाशांना दरवाज्यात लटकून करावा लागणारा प्रवास आणि अनेक वर्षे प्रलंबित असलेले पायाभूत प्रकल्प या सगळ्यांचा परिणाम प्रवाशांच्या सुरक्षिततेवर होत आहे. सीएसएमटी ते कल्याण, कसारा आणि कर्जत या मार्गावरील लोकल गाड्या नियमित उशिरा धावत असल्याने गर्दी आणखी वाढते. त्यातच एसी लोकलच्या अयोग्य नियोजनामुळे वेळापत्रक विस्कळीत झालेले आहे.

आपली ट्रेन चुकू नये म्हणून अनेक प्रवासी रुळ ओलांडण्याचा धोका पत्करतात, तर काही जण भरगच्च गाड्यांमध्ये दरवाज्याला लटकून प्रवास करतात. ठाणे स्थानक परिसरात घडणाऱ्या अपघातांपैकी बहुतेक घटना रुळ ओलांडताना किंवा धावत्या गाडीतून पडल्यामुळे घडल्या आहेत. २०२५ मध्ये रुळ ओलांडताना १२५ पुरुष आणि १९ महिलांचा मृत्यू झाला, तर धावत्या लोकलमधून पडून ६० पुरुष आणि ६ महिलांनी जीव गमावला.

२०२२ ते २०२५ या काळात मृत्यूंचे प्रमाण वाढत असतानाही ठोस उपाययोजना करण्यात प्रशासन कमी पडल्याची टीका होत आहे.ठाणे स्थानकावरील गर्दी कमी करण्यासाठी २०१६ मध्ये कळवा-ऐरोली उन्नत मार्गिका प्रकल्पास मंजुरी देण्यात आली होती. या प्रकल्पामुळे कल्याणहून थेट ऐरोलीपर्यंत लोकल सेवा सुरू होण्याची अपेक्षा आहे.

मात्र प्रकल्प पूर्ण होण्याची निश्चित वेळ अद्याप जाहीर झालेली नाही. परिणामी, ट्रान्सहार्बर मार्गावरील प्रवासासाठी प्रवाशांना ठाणे स्थानकावरच अवलंबून राहावे लागते. दरम्यान स्थानक परिसरातील अनधिकृत चोरवाटा बंद करणे, रुळ ओलांडण्यावर नियंत्रण ठेवणे आणि लोकल वेळेत धावण्याबाबत रेल्वे पोलिसांनी रेल्वे सुरक्षा दल व मध्य रेल्वेला पत्रे पाठवली आहेत. तरीही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा दिसून आलेली नाही.

२०१७ मध्ये ठाणे आणि मुलुंड दरम्यान नव्या स्थानकाची घोषणा करण्यात आली होती. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता हे स्थानक अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. मात्र अनेक वर्षे उलटूनही ते सुरू झालेले नाही. त्यामुळे विद्यमान ठाणे स्थानकावरील गर्दी कायम आहे.आरएलडीए आणि ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे स्थानकाचे मल्टी-मोडल ट्रान्झिट हबमध्ये रूपांतर करण्याची योजना आहे. या प्रकल्पात व्यापारी संकुल आणि हेलिपॅडचाही समावेश आहे. मात्र या पुनर्विकासाचे काम कधी पूर्ण होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

# मुंबई क्लायमेट वीक अंतर्गत ‘47oC’ लघुचित्रपट प्रदर्शन, उपाययोजना संवाद कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, नवी मुंबई :** क्लायमेट वीकचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका, प्रोजेक्ट मुंबई आणि एसआयईएस इन्स्टिट्यूट, नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘४७ओउ’ या लघुचित्रपटाचे प्रदर्शन व त्यानंतर उपाययोजनांवरील संवाद कार्यक्रम संपन्न झाला.

लघुचित्रपटानंतर ‘हवामान बदल आणि त्याचा सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होणारा परिणाम’ या महत्त्वपूर्ण विषयावर आधारित चर्चासत्र पार पडले. यामध्ये लेखक व चित्रपट दिग्दर्शक तेज सिसोदिया, सिविक स्टुडिओचे श्रेय जैन आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांनी वैचारिक सहभाग घेतला.

यावेळी वाढत्या तापमानाची तीव्रता, शहरी भागातील उष्णतेची समस्या, कचरा व्यवस्थापन, हरित उपक्रम आणि नागरिकांच्या सहभागाची गरज यावर चर्चा करण्यात आली. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी शाश्वत जीवनशैली, पर्यावरणपूरक सवयी आणि स्थानिक पातळीवर राबवता येणाऱ्या उपाययोजनांवर विशेष भर देण्याविषयी भाष्य करण्यात आले.

या कार्यक्रमाला एसआयईएस महाविद्यालय नेरूळ, डी वाय पाटील महाविद्यालय नेरूळ, स्टर्लिंग कॉलेज नेरूळ, बंट्स महाविद्यालय येथील १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपली मते मांडली आणि पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार व्यक्त केला. मुंबई क्लायमेट वीक अंतर्गत आयोजित ‘४७ओउ’ या लघुचित्रपटाचे प्रदर्शन व त्यानंतर उपाययोजनांवरील संवाद हा उपक्रम युवा पिढीमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

# लासलगाव पोलीस ठाण्याच्या सहा.पोलीस निरीक्षकपदी दीपक पाटील रुजू

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (अझख) म्हणून सन्मा. दीपक पाटील यांनी नुकताच आपला पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे लासलगाव व विंचूर परिसरात समाधान व्यक्त होत असून त्यांच्या नेतृत्वाखाली कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

दुसरीकडे, अत्यंत कार्यक्षम अधिकारी म्हणून ओळख निर्माण केलेले भास्करराव शिंदे (अझख) यांची नाशिक येथे बदली झाल्याने त्यांना विंचूर व लासलगाव परिसरातील नागरिकांच्या वतीने निरोप देण्यात आला. हा निरोप समारंभ अत्यंत भावूक वातावरणात पार पडला. शिंदे साहेबांच्या कार्याचा अमिट ठसा भास्करराव शिंदे यांनी आपल्या कार्यकाळात केवळ गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवले नाही, तर आपल्या मनमिळाऊ स्वभावाने जनमाणसात अढळ स्थान निर्माण केले. सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती आणि कामापलीकडे जाऊन जिव्हाळ्याचे संबंध जपण्याच्या त्यांच्या शैलीमुळे आज त्यांना निरोप देताना उपस्थित प्रशासन, राजकीय नेते, पत्रकार आणि ग्रामस्थांच्या डोळ्यात पाणी तरळले. मान्यवरांनी व्यक्त केल्या भावना याप्रसंगी विंचूर येथील कैलास सोनवणे, किशोर पाटील, विलास गोरे, किशोर जेऊघाले, सोहेल मोमीन तसेच डोंगरगाव आणि खडक माळेगाव तसेच पंचक्रोशीतील अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिंदे साहेबांचे कार्य लासलगाव परिसरात कायम स्मरणात राहील, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. नूतन अधिकाऱ्यांचे स्वागत नवनियुक्त सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांचे स्वागत करताना ग्राम स्थांनी अपेक्षा व्यक्त केली की, त्यांच्या काळात सर्वसामान्यांना तत्पर न्याय मिळेल आणि पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होईल. दोन्ही अधिकाऱ्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस आणि उज्ज्वल भविष्यासाठी उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# थोडक्यात

## महाशिवरात्री निमित्त राजेश्वर देवस्थान येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१३, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्द येथील राजेश्वर देवस्थान येथे सालाबादप्रमाणे यंदाही महाशिवरात्री उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. हा उत्सव रविवार, दि.१५ फेब्रुवारी २०२६ व सोमवार, दि.१६ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे. मधुकर श्रीपती उदमले (राजेश्वर एजन्सी) यांच्या तर्फे रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत श्री राजेश्वर महादेवाचा महारुद्राभिषेक संपन्न होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ वाजता कवड्यांची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. याच दिवशी सायंकाळी ६ वाजता शिव - पार्वती विवाह सोहळा व शिव तांडव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाचे सादरीकरण सुनील भावसार (श्रीरामपूर) करणार आहेत. तसेच रात्री ८ वाजता ते सकाळी ५ वाजेपर्यंत राज राजेश्वर एकतारी भजनी मंडळाचा अखंड भजन कार्यक्रम होणार आहे.

सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत ह.भ.प.पुष्पाताई जगताप महाराज (आष्टी, जि.बीड) यांचे काल्याचे हरिकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. यानंतर दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत महाप्रसाद (भंडारा) होणार आहे. या कार्यक्रमास खासदार प्रसादराव तनपुरे तसेच आमदार प्राजक्त दादा प्रसाद तनपुरे, मंत्री (नगरविकास, ऊर्जा, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन), महाराष्ट्र राज्य हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना कृष्णाई वारकरी शिक्षण संस्था, कात्रड तसेच राहुरी खुर्द येथील वारकरी संप्रदाय भजनी मंडळ यांचे सहकार्य लाभणार असून, हरिकीर्तनास साथ केली जाणार आहे. या महाशिवरात्री उत्सवाचा लाभ घेण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, तसेच समस्त ग्रामस्थ व तरुण मंडळांनी कार्यक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन राजेश्वर सेवा मंडळ, राहुरी खुर्द यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## छत्रपती संभाजी राजे यांच्या पुतळ्याची उभारण्याची छावा संघटनेची मागणी



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१३, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी येथील छावा मराठा संघटनेच्या वतीने शहरात छत्रपती संभाजी राजे भोसले यांच्या अश्वारुढ पुतळ्याची उभारणी करण्यात यावी. अशी मागणी नुकतीच नगराध्यक्षाप्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्याकडे निवेदनातून केली आहे. याप्रसंगी छावा मराठा संघटनेचे शहराध्यक्ष प्रा.डॉ.माधव हळदेकर, कार्याध्यक्ष डॉ.नरेश बोधनकर, उपाध्यक्ष करण समेटवार, सचिव दत्ता हमंद, सदस्य अनिल पेंटावार, विनोद काळेवार, राजेश कागळे, यांच्यासह गजानन कोटलावार, नगरसेवक रमेश इरलावार,संजय गोनेलवार, नगरसेविका अर्चना पोतनकर, भीम पोतनकर, शिव जायेवार, लखन नागुलवार,साईप्रसाद येपुरवार, गणेश कोडगीरे, साईनाथ धुसलवाड इत्यादींची उपस्थिती होती. यावेळी नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी छत्रपती संभाजी राजे यांच्या पुतळ्याची उभारणी करून देण्यात येईल असे आश्वासन दिले आहे.

## पालघरमध्ये भूमिपुत्र एल्गार संघटनेचा आंदोलनाचा इशारा

### २० वर्षांच्या सेवेनंतर ६० महिला कर्मचाऱ्यांना कामावरून कमी



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१३, जव्हार (पालघर) :** आदिवासी विकास विभाग अंतर्गत कार्यरत आश्रमशाळांमध्ये गेल्या दोन दशकांपासून धुलाई कर्मचारी म्हणून सेवा बजावणाऱ्या सुमारे ६० महिलांना अचानक कामावरून कमी करण्यात आल्याने पालघर जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. शासनाने ‘आऊटसोर्सिंग’ (बाह्य स्त्रोत) धोरण राबवत एकत्रित ठेका पद्धतीचा अवलंब केल्याने स्थानिक भूमिपुत्र महिलांच्या रोजगारावर गदा आली आहे. या निर्णयाविरोधात भूमिपुत्र एल्गार संघटना आक्रमक झाली असून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. बाधित महिलांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, त्यांनी सुरुवातीला केवळ ३० ते ४० रुपये प्रतिदिन इतक्या अत्यल्प मजुरीवर काम सुरू केले. काळानुसार वेतन वाढत जाऊन सध्या त्यांना ६०० रुपये मानधन मिळत होते. मात्र २० वर्षांची अखंड सेवा करूनही कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कामावरून कमी करण्यात आल्याने त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ ओढवली आहे. अनेक महिला कुटुंबाचा मुख्य आर्थिक आधार असल्याने हा निर्णय त्यांच्या आयुष्यावर मोठा आघात ठरत आहे.

या अन्यायाविरोधात सर्व महिलांनी भूमिपुत्र एल्गार संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज जव्हार येथील प्रकल्प कार्यालयात जाऊन प्रकल्प अधिकारी डॉ. अपूर्वा बासुर यांची भेट घेत महिलांची कैफियत मांडली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पवार, सरचिटणीस नवनाथ भोये, आदिम शक्ती प्रमुख व जिल्हा सरचिटणीस स्वप्नील वाघ, विजय राऊत, स्वप्नील जाधव यांच्यासह सर्व कामगार महिला उपस्थित होत्या.

संघटनेचे अध्यक्ष प्रमोद पवार यांनी शासनाच्या या धोरणाचा तीव्र निषेध करताना सांगितले, स्थानिक महिलांनी आपले आयुष्य आश्रमशाळांच्या सेवेसाठी वेचले. त्यांना न्याय देण्याऐवजी शासन बाह्य संस्थांना ठेका देत आहे. हा भूमिपुत्रांवर झालेला अन्याय आम्ही सहन करणार नाही. संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, शासनाने आऊटसोर्सिंग धोरणाचा पुनर्विचार करून या अनुभवी महिलांना तात्काळ पुन्हा कामावर घ्यावे; अन्यथा पालघर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडले जाईल. दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणात सकारात्मक भूमिका घेत न्याय द्यावा, अशी अपेक्षा बाधित महिलांकडून व्यक्त करण्यात येत आहे.